
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# दृष्टान्त पाठातील समाजजीवन




**प्रा.डॉ. चारूशिला राजेश्वर रूमाले**
**श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय,अकोला.**

**सारांश :**

दृष्टान्तपाठ हा तत्कालीन परिपूर्ण ग्रंथ असल्यामुळे यातील दृष्टान्तातून तत्कालीन समाज, कुटुंब–संस्था विवाह–संस्था, स्त्री–पुरुष दर्शन, जातिसंस्था, व्यवसाय व उद्योग, चलनी नाणी व वजनमापे, पदार्थ व्यवस्था चित्रकला, स्थापत्यकला, खेळ व मनोरंजनाची साधने, भाजीपाला व फळे रोग व त्यावरील उपाय श्रद्धा–अंधश्रद्धा, झाडेझुडपे व पशुपक्षी, परंपरागत पद्धती, जादूटोणा खेड व मनोरंजनाची साधने, रितीभाती पद्धती व पीकपाणी आणि इतर समाजदर्शनासाठी आवश्यक असर्णाया बारीक–सारीक बाबींची ओळख होते व एकसंघ असे समाजदर्शन दृष्टान्तात उतरते. देवता, जीव, प्रपंच, परमेश्वर, अधिकारी व अनाधिकारी जीव, परोक्ष व अपरोक्ष ज्ञान साधकांची अवस्था, मोक्षाची साधने या द्वारा महानुभावीय तत्त्वज्ञानाची ओळख करून देण्यात आली आहे.

मराठी वाङ्‌मयातील एक हजार वर्षापूर्वीचा काळ महानुभाव वाङ्‌मयाने गजबजलेला दिसतो. आद्यग्रंथ म्हणून लिळाचारित्राला पहिला वहिला मान दिला जातो या संप्रदायाला ‘दत्त किंवा कृष्ण’ संप्रदाय असेही म्हणतात. परमेश्वराचे पाच अवतार म्हणजे श्रीकृष्ण, श्रीदत्त, श्रीचांगदेव राऊळ, गुंडमराऊळ, श्रीचक्रधर हे पंचकृष्ण ठरतात. या पंथांच्या श्दृष्टान्तपाठश हा संकलनात्मक व टिकात्मक ग्रंथ म्हणून गौरविला गेला आहे. त्याची बांधणी सूत्र दृष्टांन्त व दृष्ट्रीर्तिक अशी झालेली आहे. त्यापैकी सूत्र हे शास्त्रीय पद्धतीने दृष्टान्त लौकिक व दृष्ट्रीर्तिक हे पंडिती वळणाच्या भाषेद्वारा व्यक्त झाले आहे. हा तत्कालीन परिपूर्ण ग्रंथ असल्यामुळे तत्कालीन समाजाचे चित्र त्यात प्रतिबिंबित झालेले आहे. या शोध निबंधामध्ये समाजजीवनाच्या विविध घटकांचा शोध घेतला जाईल निबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहे.

१. तत्कालीन समाज जीवनाचा अभ्यास करणे.
२. कुटुंबसंस्था स्त्रीदर्शनाचा शोध घेणे.
३. यादव काळातील व्यवसाय व व्यवसायिका बद्दल माहिती मिळवणे.
४. तत्कालीन स्थापत्यकला कशाप्रकारे होती ते अभ्यासणे.
५. पदार्थ व्यवस्था.
६. रोग व रोग निवारण उपाय कोणकोणते प्रचलित होते.
७. व्यवसाय व उद्योग कोणकोणते केल्या जात होत.
८. सामाजिक चालीरीती कोणकोणत्या?
९. आर्थिक, सामाजिक, धार्मिक विचारांचा शोध घेणे.

तत्कालीन काळातील समाज व्यवस्थेचे स्वरूप खालील प्रमाणे

**१) सामाजिक जातिभेद –** यादव काळातही समाजात जातीत होते.

**१. कर्मचांडोळाचा दृष्टान्त**

“बाई जानतेया परिस पर नेणता चांग। कर्म चांडाळा परीस जात चांडाळ चांग।”

### २. द्विभार्याचा दृष्टान्त

"कवणा एकांती दोन स्त्रिया एक आवडती एक नावडती नावडतिच्या ठाई अन्न वस्त्र निवारा खाणे पिणे पण आपणपे नेदी आपण पे ते आवडति ऐसी ची दे"

### ३. सामान्य स्त्रीचा दृष्टान्त

"कव्हणा एक सामान्य स्त्री असेरू ती जगाचा कवे खात जन्म जाप."

### ४. पतिव्रतेचा दृष्टान्त

व्याभिचारी स्त्री, वैश्या, द्विपत्नीत्वाची पद्धती होती त्याचप्रमाणे पतिव्रता स्त्रियासुद्धा असून आपल्या पतीला परमेश्वर मानित त्या करिता कठोर असे तपाचरण व व्रतवैकल्य करीत.

### ५. व्यवसाय व व्यवसायिक

यादव काळा मध्ये विविध व्यवसाय व व्यवसायिक होते हे समुद्राचा दृष्टांत माळेकराचा, वांदेकराचा, कपालपरीक्षेचा, फुटाणे कराचा, गुळहरीयाचा, वर्तेचा, तनधेलेया वावरचा, हिरेखाणियेचा दृष्टान्त वरून हे व्यवसायिक होते.

महाराष्ट्र पूर्वीपासून एकसंघ असला तरी समाज बाहेरून आवक होत असे हे हे अहिर देशाच्या मातरीयेच्या दृष्टान्ता वरून दिसून येते तसेच या काळात राज्याला व लोक समुद्रापासून सोने माणिक मोती मिळवत हे समुद्राच्या दृष्टान्ता वरून दिसते.
"परमेश्वरापासौनि चतुविध दान असती"

### १. माळेकाराचा दुष्टान्त

"हा का गा खाड देईन एथौनि तुमचे जीवाची घृणा नृपजे एथौनि तुमचे दोष बाहिरी घालिजति तरी पोरे हो पोटी सुरी सोसो मराल" गावरक्षणाच्या व्यवसायाचा उल्लेख येथे आला आहे.

### २. वर्तेवरी चारणारी चा दुष्टांन्त

"कव्ह्नी एक वर्ते परी चाले ति डावेकडे न पाहे न उजवीकडे न पाहे सभेकडे न पाहे मग तयासि वर्ते साधे" अशा प्रकारे यादवकाळात अनेक व्यवसायहोते व व्यवसायिक होते.

### ३. खातीयेचा दुष्टान्त

"गावी खाती येरू आवधी मिळौनि कामीठा घालविती एकी वासना तो कमीठा घाली अवधे गावीचे खांडी सुरिया निसविती"रू

तसेच जर रणांगणात जाऊन मृतदेहाची 'कपालपरीक्षा' करणारा धातुपार्दी म्हणजे किमयागार, मृतदेहाची कपाल परीक्षा करीत होते. म्हणजे ते जादू किंवा किमया या गोष्टीवर विश्वास ठेवत होते. हे पुढील वृत्तांत यावरून दिसून येते.

### ४. धातुर्वादियेचा दुष्टान्त

"कव्हनी एकू धातुर्वादी असे तो रण सोधु जाये ते एरी कानी कडी झाली ते सांडी आणि काचीए कानी काडी घाली ते तोंडाने निगे ते ही सांडी आणि काचीए कानी काडी घाली ते भीतरी जाए ते घे"

### ५. फुटानेकाराचा दुष्टांन्त

"कव्हनी एक फुटानेकरू असे तो चनेयासि वोल दे भिजति मग एकि वाळू घालि ते फेडी हिरवट आणि कठीणत्व हे दोन्ही दोष जाति सुर मृदत्त्व हे गुण एति कंचुकवच टरल होय" फुटानेकार प्रयत्न करून मृदृ व सुवासिक फुटाणे बनवतो तद्वतच परमेश्वर,शब्द,परोक्ष,अपरोक्ष ज्ञान देऊन प्राप्तीयोग्य करतात.

### ६. गुळहारीयेचा दुष्टांन्त

मळकर्म निवर्तल्याशिवाय जीव परमेश्वराच्या कृपाप्रसादास प्राप्त होवू शकत नाही.

"कोणी एक पुढारी होता तो गुड तयार करी त्यासाठी तो उसाचा रस काडी त्यानंतर त्याला काडी–काटी उकडी त्यामधील मळी वेगळी करी नंतर भांड्यात घाली तो रस घट्ट होई व गूळ तयार होई."

यामध्येही परमेश्वर जीवाच्या मलीन कर्माचा नाश करून प्राप्तियोग्य करतात तसेच दोरीवरून खडग धारे वरून चालणारे लोक होते. तेव्हा त्या समाजामध्ये जगण्यासाठी, उदरनिर्वाहासाठी खेळ करीत.

खाती लोहाराच्या कामातील धार लावण्याची क्रिया गुळ तयार करण्याची पद्धती तपशीलवार सांगितल्या आहेत त्या काळात हा व्यवसाय लोक करीत असत.

## ७. तनधैलेया वावराचा दुष्टांन्त

"तनधैलेया वावर असे हे आतु बाहीरी तने दाटले तथा झाले असे मग नागरीजे दुनिजे कासिया फेडीजाती मग पेरिजे कुमचासी तया भार आतौनि पिके ना तैसेजि पेरिजे तरी न पीके"

वावराचा उच्चार करण्यात आला कारण शेती हा महत्त्वाचा व्यवसाय आहे. त्या समाजामध्ये होता. त्याच प्रमाणे अवजाराचाही उल्लेख आला आहे.

यादवकालीन समाजामध्ये वाटरोपाच्या सभोवती ते शेळ्या–मेंढ्यांच्या खुराखाली जाऊ नये म्हणून "कूपकाटी" म्हणजे काटेरी कुंपण करण्याची पद्धत होती हे कळते. वटरोपाचा दृष्टांतश तसेच इतर व्यवसायात हिऱ्याच्या खाणकामाचा उल्लेख महत्त्वाचा आहे.

## ८. हिरेखणियेचा दृष्टान्त

"कव्हि एक हिरेयाची खाणी खाणति खणता खणता खांब रडती वोदरे तेथ मध्ये टेका सुती तथाती षटकोणी निगे एकावरी दरडी पडे"

यावरून महाराष्ट्र मध्ये त्या वेळी एखादी खाण असेल तर असेल यावरून आपल्या कर्मानुसार फलप्राप्ती ईश्वर देतो हे कळते.

## ६. परंपरागत पद्धती

**स्थापत्यकला** – बांधकामा पैकी कानवाथर व शिरसाळा या पाषाणाचे दाखले मिळतात शिवलिंगे व देवादिकांच्या मूर्ती त्या शिरसाळ्याच्या करीत हे कानवायराच्या दृष्टान्ता मध्ये दिसते तसेच देवळातील चांदोण्याला शेना मातीची केली सुंदर कडे लटकून देण्याची पद्धत होती.

"चांदोन्याचा दृष्टान्त कव्हि एका क्षुधार्थी देऊळासि ये तव चांदोवा आलेय सारखा आंबे देखे केळासारीखे केळे देखे नारीपळा सारिखे नारिएळे देखे जांबूळासारखी जांबूळे देखे तीये तोडूनि खावो बैसे तन सेना माती तोंड भरे."

त्याचबरोबर माळवदाची घरे व त्यातील गुरे बांधण्याची 'पडाळ' याचेही उल्लेख आढळतात 'पडाळीचे गाईचा दृष्टांत' यामध्ये त्याकाळी पाणी भरण्यासाठी वापरण्यात येणारे साधन म्हणजे 'रहाटगाडगे' धान्य साठवून ठेवण्याकरिता 'मोंदळा' म्हणजे धाण्याची कणगी किंवा घटिका यातील बुडास भोक असलेले भांडे हे वापरण्यात येत होते. हे मोदळेयाचा दृष्टान्तावरून दिसते.

"मोडळा असे त्याचे घेते द्वार सानिरू संडीते द्वारे थोर"

धान्याची कणगी या अर्थाचा शब्द खानदेशात रूढ आहे. त्याचा दुसरा अर्थ पाणी पिते घडीवटे म्हणजे बुडास धिद्र असलेले घटिकायंत्राचे भांडे. हे दोन विशेष उल्लेखनीय आहेत.

## ४. खाद्यपदार्थ पदार्थ व्यवस्था

खाद्यपदार्थ पैकी वाळ्काचा उल्लेख मनोरंजक आहे. वाळके मीठ, मिरपूड लावून खाण्याचा प्रघात असे हे जारसैलेया वाळकाचा दृष्टान्ता वरून कळते.

"जारसैले वाळूक असे ते खापोची नए ऐसाही मीठ मिरपुडी लाउनी खाईजे तरी तोंडी खतची पडे."

परंतु कोवळ्या वाळकाचे तळीव पदार्थ, कोशिंबीर, लोणचे इ.पदार्थ केल आन आंब म्हणजे आमटी व खिरीचा उल्लेख 'चाटसिएचा दृष्टान्तात येतात.

"कव्हणी एकि सुरारनि असे ते चाटसिएने व्यापारविति पाकनिष्पत्ती करी आंबातू घाली खीरी आनघाती षडरसा पाकातू घाली"

## ५. रोग व त्यावरील उपाय

यादव कालीन समाजामध्ये कोणत्या प्रकारचे खाद्यपदार्थ तयार केले जात होते हे प्रत्ययास येते. खाद्यपदार्थ कोणकोणते रोग व त्यावरील उपाय कशाप्रकारे केले जात होते.

१. आतङ्याच्या आतील पदरात येणारी वज्रकिटकी अदृश्य अक्लेद्य व अछेद्य असून अपेयपान हा तिच्यावरील उपाय होय आरोप काल्पनिक असावा पण दृष्टान्तपाठातील वर्णनावरून वज्रकिटकि हा आंत्रव्रणा सारखा एक रोग दिसतो.

२. सन्निपात ज्वरात रोगीअसंबब्द बडबड व क्वचित शिवीगाळही करतो

"कव्हणा एकाचा पाइक संन्निपातैला असे तो आपुलिया गोसावीयासी मेळीएची सीवि दे तो तेयाचे वोरपडे नोव्हे हिताची प्रवर्त मग म्हणे याते कोणी राखो का गा यातेजो राखैल तेयासी मी एव्हडी सोनियाची राशी करिनरू तिची सावध जालेयावरी जरी म्हणे तरी अव्हेरितीरू सुरिया म्हणौनि मारूवि फेडीती.

३. कुष्ठरोगात हातापायाची थापे होत व त्या रोगाची सर्वजण खंत करीत मी कसे वागावे? असा प्रश्न केल्यावरून चक्रधरांना एक कुष्ठरोग्यांची गोष्ट सांगून श्देव माझारू मी देवाचारू अशा रीतीने वागावयास सांगितले.

४. अग्नी संबंध केला असता कप, वात, पित्त, अग्नीचा शेक घेतला तर बाधत नाहीत. हे अग्नीसंबंधाचा दृ ष्टान्तात दिसते.

ष्अग्नीचा संबंध तोपर्यंत करावारू जैसा पैर्हा गेलेया वात श्लेष्म बधीतीष अग्नि संपर्कात वात श्लेष्मादी विकारांची बाधा होऊ शकणार नाही या मर्यादेपर्यंत अग्नीचा संबंध केला पाहिजे

५. **अग्निमाध** – लहान मुलाला भूक जाऊन माद्य येते. हिरड्या बेहेडेयाची गुळणी हा त्यावरील उपाय सांगितला.

## सामाजिक चालिरिती

नगरातील गायक, भाट, सैपाकी, वेश्या, कलाल इत्यादिकांनी राजापाशी विडा मागावयास जाण्याची पद्धत होती हे बांदकरीयेच्या दृष्टान्तावरून कळते.

माणसाची खरेदी–विक्री म्हणजे गुलामगिरीचा उल्लेख आहे त्याचप्रमाणे यादव काळामध्ये राजास कोणी काही भेट आणून दिली तर राजा त्याला श्दानप्रसादश देत असे असे सुरियाचा दृष्टान्त सांगतो.

**आदरातिथ्य** – तत्कालीन अतिथ्याची कल्पना परिसराचा दृष्टान्त यावरून कळते. ब्राह्मण पण घरी आलेल्या महात्म्यांचा आदर सत्कार पुढीलप्रमाणे करतो

"घरीचिया ब्राह्मणी वोसरीए पिढे घातले लोणीयाचा कवडा तवीला मग तयासी ठावो केला तया दोधाही तो जेविला तूटकी ऐसी बाज तिएवरी फाटकी ऐही वाकड आथुरीली ते नीजावेया दिधली तयाचे पाय धुतले चोपडीले इतुलेणी तो संतोषला" अशा प्रकारे गरीब ब्राह्मणाने आदरातिथ्य केले.

राजकीय दृष्ट्या विचार करता त्यामध्ये अनिर्बंध मध्यवर्ती राज्यसत्ता रूढ दिसते. यादृष्टीने सिंदेराणेंयाचा दृष्टान्त उल्लेखनीय आहे. त्यातील राजा राज्यभ्रष्ट झाल्यानंतर त्याच्या पाईक परिवाराची वाताहत झाली. परंतु त्याच्या या पदरचे भांडलिक सिदेराणे आपल्या चक्रवर्तीशी एकनिष्ठ राहिले. त्या चक्रवर्ती राजानेही ही पुन्हा राज्य मिळवले या मध्ये आलेल्या 'पंचनगरा' चा निर्देश महत्त्वाचा आहे. ही 'पंचनगरे' म्हणजे पंचग्रामधिकारी किंवा ग्रामपंचायत असून ही शासनसंस्था निदान यादवकालाइतकी तरी प्रचलित दिसते.

## माळेकाराचा दृष्टान्त

सामाजिक गुन्हे व त्यासाठी होणारी शिक्षा यापैकी केवळ चोरीचा उल्लेख आढळतो तो वधू–वराचे वराड लुटतो ब्राह्मणांना मारतो तेव्हा त्याला त्याच्या शरीराचे मोहरी एवढे तुकडे करून त्यांनी गाव पुजावा ही शिक्षा देण्यात येते.

आर्थिक व्यवहाराचा विचार करता रुणाइताचे म्हणजे कर्जदाराची ऋण तो शरण आले असता राजाने फेडावे व त्याला ऋणमुक्त करावे अशी प्रथा दिसते.

तत्कालीन समाजाची प्रवृत्ती मुख्यतः धार्मिक असल्यामुळे दृष्टान्तपाठा सारख्या ग्रंथात तत्कालीन धार्मिक वातावरण प्रतिबिंबित व्हावे यात नवल नाही निरनिराळ्या या धर्मपंथापैकी श्महात्म्याश चा उल्लेख दोन दृष्टान्तात आढळतो 'शब्दवेधीया रसाचा दृष्टान्त' 'परिसाचा दृष्टान्त' असून दोघेही हीन धातूचे सोने करण्यास समर्थ होते असे दिसते. श्असाचग्रासिचा दृष्टान्तामध्येश असे व्रत आले आहे.

"कव्ही एक अयाचग्रासाचिया असे तेयासी कव्ही एक घासू सुए तेणे चावावा गिळावा इतुलेचे परी धातुते नेते ते आणिक असे."

या वृत्तीने राही 'व्यतिपाता'— साठी ब्राह्मणास दान देण्याची पद्धती रूढ होती. 'कठिया' दृ म्हणजे गुरव त्याच्याकडे 'भोगस्थान' ची देवळाची शु**श्रु**षा झाडलोट, सडासंमार्जन इ. कामे असत.

डोळे डोळ्याला पाहू शकत नाही. परंतु असे पाहण्याचे साधन होते. 'डोळेयाचा दृष्टान्ता' वरून कळते. काही कविकल्पनाही त्या काळात रूढ दिसतात. त्यापैकी चंद्राच्या किरणांनी द्रवणारा सोमकांत, इच्छीत देणारा कल्पवृक्ष अमरत्व देणारा अमृत, हीन धातूचे सुवर्ण करणारा परीस, चोच वर करून पावसाची वाट पाहणारा चातक.

डोळ्यांचे ठिकाणी तेज सामग्री, मेद सामुग्री, दोन स्वतः सिद्ध सामुग्री असून पहिलीची वाढ केल्यास डोळा रत्नाच्या गर्भातील स्फुरणारे रंग पाहू शकतो व दुसरीची वाढ केल्यास तो आंधळा होतो अशी कल्पना दिसते.

वस्तुविनिमय पद्धती असून काही ठिकाणी कवडयांचाही वापर केला जाई. अनेक झाडा—झुडपांचा उल्लेखही येतो. उदा. हिरवं कल्पवृक्ष, बोरी—बाभळी, वाळकाचा वेल, वटवृक्ष—झाड व बी, कासव, कोंबडी, कावळा, इत्यादी पशुपक्षी यांचा उल्लेख झाला आहे. मनोरंजनाची साधनेही आली आहेत एकंदरीत समाजजीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श करणार वर्णन आपल्याला दृष्टान्त पाठांमध्ये बघावयास मिळते.

प्रस्तुत ग्रंथाचे ध्येय चक्रधरोक्त तत्त्वज्ञान सुव्यवस्थित रीतीने स्पष्ट करून सांगण्याचे असले तरी त्यासोबत त्यातून मराठी भाषेचा सुंदर गद्यविलास आणि यादवकालीन समाज स्थितीचे मनोज्ञ दर्शनही घडते. वरील विवेचना मधून खालील निष्कर्ष निघतात.

## निष्कर्ष

१. यादव काळामध्ये सामाजिक जातीभेद अस्तित्वात होते. सामान्य स्त्री, व्यभिचारी, वेश्या, व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया होत्या. पण तुरळक, सर्व समाज स्तरात पतिव्रता स्त्रिया घरोघरी होत्या तसेच तपाचरण करणाऱ्यांची संख्या जास्त होती.

२. विविध व्यवसाय यादव काळामध्ये चालत व्यापार उदिम जोरात चालत होता. दूध—दुभत्या, शेती—माती, गुराढोरांची, धातु संबंधी सोने—रूपे, उच्च प्रतीचे तसेच आपल्या शरीराला संकटात टाकून वर्तेवर खडग धारेवर चालण्याचे पोटासाठी व्यवसाय करीत. खाती, फुटाणेकर, गुलहरी, आपापला व्यवसाय करीत.

३. विविध खाद्यपदार्थाचे उल्लेख जसे वाळका पासून विविध पदार्थ खारी सारखे गोड पदार्थ बनवत असत.

४. वज्रकीटकी, दूध, सन्निपात ज्वर, कुष्ठरोग, अग्नि संबंधी अग्नीमाध, हिरडेबिहीडे यांची गुळणी इत्यादी रोग व त्यावरील उपाय सांगितले.

५. आदरातिथ्य, विविध सामाजिक चालिरिती, अर्थ, धर्म, समाज, विचार व्यक्ती झालेले आहेत व चोख व कडक सुरक्षा व्यवस्था शहराभोवती असे गुन्हेगाराला कडक शिक्षा देण्यात येत होती.

## संदर्भ


१. 'दृष्टान्तपाठ' — केसिराज बास कृत, सुविचार प्रकाशन मंडळ पुणे, प्रथम आ. १९६४ संपादक — शे. गो. तुळपुले.

२. महाराष्ट्र सारस्वत — वि. ल. भावे आ. पहिली म. सा. श. मंडळ पुणे.

३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास — अ. ना. देशपांडे.

४. महानुभाव वाडमय स्वरूप व शोध — वि. भि. कोलते.